॥ श्री ॥
॥ बाबा ॥

तू माझी माता, माता
तू माझी माता, आता ॥ धृ ॥

माता म्हणूनी लाड पुरविता
चुकता कोठे मारही देता
देवूनी ममता हर जीवाला
डोळा येई पाणी आठविता ॥ 1 ॥

बाबा वाटे माहेरी यावे
मोह आहे मन हे सांगे
नाही रमत मन हे कोठे
गुरुकडे याया मागे ॥ 2 ॥

बाबा माझी काय ही अवस्था
सहन होईना विरह मजला
सतत ते ध्यान डोळयासमोरी
करी जीव बैचेन माझा ॥ 3 ॥

काटे म्हणूनी विरह मजला
सतत टोचे होऊनी दुःख
म्हणता आहात ह्रदयी माझ्या
का नाही येत अद्वैतता ॥ 4 ॥

बाबा नाही खोटे सांगत
आहे सत्यता शब्दाशब्दांत
होई वेडापिसा माझा जीव
स्मरता गुरुपदा ॥ 5 ॥

बाबा राहील माझी ही दशा
जोवरी आहे व्दैत अवस्था
जाळूनी टाका माझा अंहकार
करुनी तनमन एक ॥ 6 ॥

★★★★★